# वाचनासाठी 'नेटा'चे प्रयत्न

5 Sep 2010, 0038 hrs IST

**मंदार जोगळेकर**



**सीईओ, बुकगंगा डॉट कॉम**

> 'बुकगंगा डॉट कॉम'(bookganga.com)ची नक्की संकल्पना काय?

वाचणारी माणसे कमी झाली नसून वाचण्याच्या पद्धती बदलत आहेत. त्यामुळेच वाचनसंस्कृती कमी होतेय असे म्हणणे साफ चूक आहे. आज इंटरनेट आणि कॉम्प्युटरच्या युगात पुस्तके छापील स्वरुपात जेवढी वाचली जातात तेवढीच ती डिजिटल रुपातही वाचली जातात. यासाठीच जगभरातल्या वाचकांपर्यंत मराठीसह सर्व भारतीय भाषांतील पुस्तके पोहचवण्यासाठी आम्ही 'बुकगंगा डॉट कॉम' ही वेबसाइट सुरू केली आहे. छापील आणि डिजिटल अशा दोन्ही स्वरुपातील पुस्तके या साइटवर परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध आहेत.

> इंटरनेटवरील पुस्तकांची जागतिक बाजारपेठ आणि भारतीय पुस्तकांचे जग यांची तुलना होऊ शकते का?

भारतात वाचन ही फक्त सवय नसून ती एक संस्कृती आहे. जागतिक बाजारपेठेत आज अब्जावधींचा पुस्तकव्यवहार फक्त इंटनेटवर होतो. मराठीसह सर्व भारतीय भाषांमध्ये हे प्रमाण खूपच कमी आहे. याचे कारण मागणी नाही असे नसून पुरवठा करणारे कमी आहेत हे आहे. जगभर पसरलेल्या लोकांना पुस्तके हवी आहेत. अनेक दुकांनामध्येही ती उपलब्ध नसतात. अशांसाठी ही साइट नक्कीच उपयुक्त ठरेल. सध्या येथे मराठी, हिंदी, संस्कृत आणि इंग्रजी भाषेतील पुस्तके उपलब्ध आहेत. लवकरच बंगाली, तामिळ, पंजाबी भाषेतीलही पुस्तके उपलब्ध होतील.

> इंटरनेटचे जग फ्री-बींची जग आहे असे म्हणतात. त्यामुळे पायरसीची चिंता जगभरातील साहित्यविश्वाला भेडसावतेय. त्याचा विचार आपण कसा करताय?

'बुकगंगा डॉट कॉम' ही साइट पायरसीपासून संरक्षित आहे. यासाठी आम्ही स्वतंत्र सॉफ्टवेअर विकसित केले असून बुकगंगावरील कोणतेही ई-बुक याच सॉफ्टवेअरवर वाचता येईल. हे सॉफ्टवेअर अन्य कोणीही इन्स्टॉल केले तरीही त्याचा कोणी गैरवापर करू शकणार नाही. प्रत्येक सॉफ्टवेअर हे त्या त्या कॉम्प्युटरच्या आयपीनुसार रजिस्टर असेल. त्यामुळे इथे पायरसीच्या शक्यता जवळपास नाहीच.

> ऑनलाइन खरेदी संस्कृती अद्यापही आपल्याकडे रुजलेली दिसत नाही. अशा वेळी 'बुकगंगा डॉट कॉम'चे यश आपण कसे पाहता?

अद्यापही लोक क्रेडिट कार्डने पेमेंट करायला घाबरतात हे खरे आहे. म्हणूनच आम्ही तीन पर्याय उपबल्ध केले आहेत. वाचक चेकद्वारे पैसे देऊ शकतात, आमच्या अकाउंटमध्ये थेट जमा करू शकतात किंवा ऑनलाइन पेमेंट करू शकतात. भारतातील वाचकांसाठी आम्ही कुरिअरचा खर्चही शून्य ठेवला आहे. ई-बुकच्या किमतीही मूळ पुस्तकाच्या किमतीपेक्षा स्वस्त आहेत. त्यामुळे ही पुस्तके लोकांच्या पसंतीस उतरत असून साइट लाँच झाल्यानंतर दोनच दिवसात १५० हून अधिक पुस्तकांची विक्री झाली आहे.

> मराठी पुस्तकांबाबत याआधीही असे प्रयत्न झाले आहेत. त्याहून आपल्या या प्रयत्नाचे वेगळेपण काय?

आतापर्यंत झालेले प्रयत्न हे काहीसे विस्कळीत आणि छोटे आहेत. बुकगंगाने पहिल्याच दिवशी सात हजाराहून अधिक पुस्तके इंटरनेटवर उपबल्ध केली आहेत. यांना मिळणारा प्रतिसाद पाहता अधिकाधिक प्रकाशक या प्रकल्पाकडे येत असून हा आकडा नक्कीच वाढणार आहे. पण आम्ही या पलिकडेही विचार करत असून जुनी उपलब्ध नसलेली पुस्तके, कॉपीराइट नसलेली पुस्तकेही इंटरनेटवर आणण्याचा संकल्प आहे.

> आयपॅडमध्ये भारतीय पुस्तके कशी लोकप्रिय होतील?

अॅपल कंपनीच्या आयपॅड हे सध्या जगभर गाजते आहे. मराठीसह भारतीय पुस्तकेही या आयपॅडवर वाचताय यायला पाहिजेत. त्यासाठी येथे उपलब्ध असलेले पुस्तके आयपॅडवरही वाचता येतील. ही पुस्तके आयपॅडवर वाचणे तरुणाईसह वृद्धांनाही सोपे जाईल. कारण येथे हवे ते पान हवे तेवढे लहानमोठे करून वाचण्याची सोय आहे. मराठीत हा प्रकार नीट रुजवला तर निश्चितच लोकप्रिय होईल.

> इंटरनेटवर मराठी भाषा, मराठी पुस्तके यांचे भवितव्य काय?

इंटरनेटवरचा मराठी वाचक दिवसेदिवस वाढत असून युनिकोडमुळे लोक आता ऑनलाइन मराठी लिहायलाही लागले आहेत. यातील अनेकजण असेही असतील ज्यांना छापील पुस्तके काढायची नसतील, पण ई-बुक प्रसिद्ध करायचे आहे. आम्ही अशा इंटरनेट लेखकांनाही प्रोत्साहन देणार आहोत. छापील स्वरुपात प्रसिद्ध न होता थेट इंटरनेटवर प्रसिद्ध होणारी ई-बुकही 'बुकगंगा डॉट कॉम'वर उपलब्ध होतील. या साऱ्यामुळे एकंदर लिहिणारे आणि वाचणारे यांच्यामधील दुवा साधण्याचे काम बुकगंगा करेल. आज सर्वच भारतीय भाषांची अवस्था कमी-अधिक मराठीसारखीच आहे. त्यामुळे तंत्रज्ञानाचा हा स्पर्श त्यांना निश्चितच नव्या उंचीवर नेऊन ठेवेल.

-नीलेश बने